# महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, नाशिकचा सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल

---

जा.क्र.स्था/३/ब/जिप/मबाक/नाशिक/९७६

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखा कोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांक- १८.३.२००९

प्रेषक,
उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण श्री. सं. क. गायकवाड, निवडश्रेणी लिपीक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १८.११.२००८ ते १५.१२.२००८ या कालावधीत पूर्ण केले. श्री. सु. ध. ठाकरे, प्रभारी लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी पुनर्विलोकन केले. श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी या अहवालावर चर्चा करुन अंतिमीकरण दिनांक ७.२.२००९ रोजी केले

लेखापरिक्षीत आर्थिक वर्षाच्या कालावधीत या विभागाकडे खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी कार्यरत होते.

**अध्यक्ष:-**

| | |
|---|---|
| श्री. राधाकिसन मारुती सोनवणे | ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ |

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-**

| | |
|---|---|
| श्री. ज्ञा. स. राजुरकर | ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ |

**सभापती :-**

| | |
|---|---|
| सौ. मालतीताई को. आव्हाड | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी:-**

| | |
|---|---|
| श्री. एस. आर. वाडेकर | ०१.०४.२००७ ते १०.०६.२००८ |
| श्रीमती. पी. एस. संगमनेरे | ११.०६.२००७ ते ३१.०३.२००८ |

# भाग पहिला
## (मागील लेखापरीक्षण )

मागील लेखा परीक्षणातील खालील नमुद केलेले परिच्छेद प्रलंबित असुन त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे कडे स्वतंत्र पत्र व्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | परि. संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९९४-९५ | २९(३)(४) बाब क्रमांक २ व ३ | १ |
| २ | १९९५-९६ | ६ (हरसूल), ६(३)(७) हरसुल, परिशिष्ट २ अ.क्र. इगतपुरी, सुरगाणा, बागलाण, नाशिक, मालेगांव, नांदगांव, कळवण १६(परिशिष्ट १ पैकी १ व २, ३ पैकी इगतपूरी गट वगळता), १७(१)(५)(१) चा अ.क्र ६ व ७, २३(ब),२६(३),२९,३०, ३१ (हरसुल गट), ३४(३),६९,७०,७३,७४, ७९ | १३ |
| ३ | १९९६-९७ | ४(१) परिशिष्ट १ पैकी अ.क्र. २७ ते ७५, अनु. १२७ ते १३१ ५(४),४५,४६, | ४ |
| ४ | १९९७-९८ | ४ (परिशिष्ट १ चा अ.क्र. १ ते ८ पैकी १ ते ६ व ८ आणि अ.क्र. १ ते ७१ पैकी ६२, परि.क्र. ५ परि.क्र. २, १ ते ७३ पैकी १८ ते २४, १ ते ३९ पैकी १५ ते २३),७, ८(२,३), | ३ |
| ५ | १९९८-९९ | ४,९,१०(२), १७ परि.१ पैकी अ.क्र. (७ ते २०, ४२ ते ४४),१८ (१,२,४) व परिशिष्ट २ पैकी अ.क्र. १४,३४ ते ४१,१९ परिशिष्ट ३ अ.क्र. ५, २० परिशिष्ट ४ पैकी अ.क्र. २ ते ६ व ९ ते १२,२७, ३१,३२,३३(१),४२,४३, | १६ |
| ६ | १९९९-२००० | ४(२),५(२),६,७,११,१२,१३,१४(१ ते ३२,३४,३५,३७ ते ७६), १५(अ.क्र.१ ते ४,७,१० ते ३४,३६ ते ४२),१६(१ ते २,४,५,१९ ते २६,२९ ते ७२),१९,२०,२१,२२,२३,<br>पं. रा. स. लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.११:- अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा कमी जादा खर्चाबाबत. (३.३२९)(५)<br>परि.क्र.१३:- पुरवठादाराकडुन दंड वसुली बाबत.(३.२९५) | १४ |
| ७ | २०००-०१ | ३,४(३),७(ब),८,९(परिशिष्ट २ पैकी १ ते १६,२०,२१,२५ते ५२), १० | ६ |
| ८ | २००१-०२ | ४,५,६,७,८,९,१०,११,१२ | ९ |
| ९ | २००२-०३ | ५,६,७,८,९,१० | ६ |
| १० | २००३-०४ | ३,४,५,६,८,९,१०,११,१२,१५<br>पं.रा.स.लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ. | १० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परि.क्र.४:- जि.प.सेस मधून गरजू महिलांना शिलाई मशिन पुरविणे. (३.४९७) | |
| ११ | २००४-०५ | ३,४,६,७,८,९,१०,११,१२<br>पं.रा.स.लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ.<br>परि.क्र.४:- जि.प.सेस मधून गरीब महिलांना स्वयंरोजगारासाठी शेवया मशिन पुरविणेबाबत. (३.५१९) | ९ |
| १२ | २००५-०६ | ३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२, २४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०, ४१,४१(अ),४२,४३,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५१,५२<br>पं.रा.स.लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ.<br>परि. क्र. ४:- जिल्हा परिषद सेस मधून इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शाळेत जाणा-या मुलींकरिता लेडीज सायकल पुरविणे. (१०% लाभार्थी हिस्सा) (३.११९९)<br>परि. क्र. ६:- जिल्हा परिषद सेस योजनेतून गरीब महिलांना स्वयंरोजगारसाठी पापड मशीन्स पुरविणेबाबत. (१०% लाभार्थी हिस्सा) (३.१२००)<br>परि. क्र. ७:- जिल्हा परिषद सेस योजने अंतर्गत गरीब महिलांना स्वयंरोजगाराकरीता मसाला कांडपयंत्र पुरविणेबाबत. (१०% लाभार्थी हिस्सा) (३.१२०१)<br>परि. क्र.१२:- गरीब महिलांना स्वयंरोजगाराअंतर्गत शेळीपालनासाठी अनुदान देणेबाबत. (३.१२०२)<br>परि.क्र.२१:- स्टील कपाटे वाटपाबाबत (३.१२०३)<br>परि. क्र.४२:- गरीबमहिलांना स्वयंरोजगाराअंतर्गत शेळीपालनासाठी अनुदान देणेबाबत. (३.१२०४) | ५० |

| |
|---|
| **लेखापरीक्षण अहवाल सन २००६ – २००७** |
| परिच्छेद क्रमांक ३ :- तरतुद व प्राप्त अनुदानापेक्षा कमी खर्च केल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ४ :- महिला व बालकल्याण समिती सदस्यच्या अभ्यास दौरा कार्यक्रमाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ५ :- १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षणांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ६ :- १२ वी पास मुलींसाठी संगणक प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीतील अनियमिततांबाबत...... |
| परिच्छेद क्रमांक ७ :- संगणक प्रशिक्षणाबाबत.... |
| परिच्छेद क्रमांक ८ :- १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षणांबाबत.... |
| परिच्छेद क्रमांक ९ :- संगणक प्रशिक्षण योजनेबाबत..... |
| परिच्छेद क्रमांक १० :- संगणक प्रशिक्षण योजना. |
| परिच्छेद क्रमांक ११ :- संगणक प्रशिक्षण लाभार्थींना प्रदान केलेल्या रक्कमांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १२ :- महिला व बालकल्याण योजनेतंर्गत मुलींना विद्यावेतन देणेबाबत. |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक १३ :- किशोरी मेळाव्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १४ :- जिल्हा परिषद सेसमधून महिलांना अर्थसहाय्य करणे. |
| परिच्छेद क्रमांक १५ :- गरीब महिलांना स्वयंरोजगाराअंतर्गत शेळी पालनासाठी अनुदान वाटपातील अनियमिततांबाबत... |
| परिच्छेद क्रमांक १६ :- स्वयंरोजगारासाठी गरीब आदिवासी महिलांना गाई / म्हशी अनुदान वाटपांतील अनियमिततांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १७ :- स्वयंरोजगाराअंतर्गत शेळीपालन अनुदान वाटपाबाबत...... |
| परिच्छेद क्रमांक १८ :- गरीब महिलांना स्वयंरोजगारासाठी संकरीत गाय / म्हैस खरेदी व शेळीपालनासाठी दिलेल्या अनुदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १९ :- महिला व बाल विकास सेवा प्रकल्प, त्र्यंबक व हरसूल, ता. त्र्यंबक |
| परिच्छेद क्रमांक २० :- महिला बाल विकास सेवा प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या ज्युडो कराटे प्रशिक्षणाबाबत (त्र्यंबक प्रकल्प) |
| परिच्छेद क्रमांक २१ :- गरीब महिलांना स्वयंरोजगारासाठी ९०% अनुदानावर मसाला पल्बरायसर मशिन पुरविणे |
| परिच्छेद क्रमांक २२ :- गरीब महिलांना स्वयंरोजगारासाठी शेवया मशिन पुरवणे ९०% |
| परिच्छेद क्रमांक २३ :- गरीब महिलांना स्वयंरोजगारासाठी पिको फॉल मशिन पुरवणे |
| परिच्छेद क्रमांक २४ :- गरीब महिलांना स्वयंरोजगारासाठी ९०% अनुदानावर शिलाई मशिन पुरवणे |
| परिच्छेद क्रमांक २५ :- गरीब महिलांना स्वयंरोजगारासाठी ९०% अनुदानावर मंडप व लाऊडस्पिकर संच पुरवणे |
| परिच्छेद क्रमांक २६ :- ज्युडो कराटे प्रशिक्षणाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २७ :- ज्युडो कराटे प्रशिक्षणाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २८ :- स्वयंरोजगारासाठी महिला लाभार्थींना शेळी वाटप करणे (विशेष घटक योजना) |
| परिच्छेद क्रमांक २९ :- स्वयंरोजगाराअंतर्गत लाभार्थी महिलांना गाय/म्हैस वितरण योजना राबविणेबाबत. (विशेष घटक योजना) |
| परिच्छेद क्रमांक ३० :- स्वयंरोजगाराअंतर्गत लाभार्थी महिलांना शेळी वितरण योजनेतील अनियमिततांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३१ :- श्री. एस. एस. कुलकर्णी, कनिष्ठ सहाय्यक यांना प्रदान अनुज्ञप्ती शुल्क व प्रोत्साहन भत्ताबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३२ :- प्रवासभत्ता देयकाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३३ :- अतिकालिक भत्ता जादा प्रदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३४ :- महिला व बालकल्याण विभागाने राबविलेल्या ९० % अनुदानाच्या योजनांबाबत |
| परिच्छेद क्रमांक ३५ :- आक्षेप विवरणपत्र |
| परिच्छेद क्रमांक ३६ :- विवरणपत्र |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक ३७ :- लेख्यांची स्थिती. |
| परिच्छेद क्रमांक ३८ :- वार्षिक लेखे. |
| परिच्छेद क्रमांक ३९ :- अनुपालन व पोहोच. |

टिप:- उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायात नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतिम समजण्यात यावे.

---

## भाग दुसरा
## (चालु लेखापरीक्षण)

## स्थानिक क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( अ ) खालील अनियमितता.

जे प्रदान वैधानिक तरतुदी विरुध्द करण्यात आले आहे असे प्रदान.

---

### परिच्छेद क्रमांक १ :- कुपोषित मुलासाठी अतिरिक्त आहार पुरवठा योजना

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | महिला व बालकल्याण, जि.प.नाशिक पत्र क्र. मबाक/कार्य/५/०७ नाशिक दिनांक ९.१.२००८ अन्वये १७.५० लाख |
| तांत्रिक मान्यता | मुख्य कार्यकारी अधिकारी, अर्थ/५/०८ दि. ९.१.२००८ |
| अनुदान पुरवठा आदेश | जिल्हा परिषद, नाशिक महिला व बालविकास विभाग पत्र क्र. जिपना/मबाक/अर्थ/१०४/०८ दिनांक २८.३.२००८ नुसार प्रति लाभार्थी रुपये १,७१९/- प्रमाणे<br>जि. प. सेस. ११,५०,०००/-<br>आदिवासी उपयोजना ६,००,०००/-<br>एकूण १७,५०,०००/- |
| खर्च रक्कम | रुपये १७,५०,०००/- |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) उपरोक्त अभिप्रय – २ मधील तांत्रिक मान्यता आदेशातील अट क्रमांक – ५ नुसार प्रभावी आहाराची खरेदी शासन दरकरार अथवा जाहिर निविदा मागवून खरेदी करावी असे नमुद केले आहे. तथापि जिल्हा परिषदेने महिला व बालकल्याण विभाग, नाशिक पत्र क्रमांक मबाक/अर्थ/१०४/०८ दिनांक २८.३.२००८ नुसर आदिवासी उपाययोजनेचे रक्कम रुपये ६ लाख व जिल्हा परिषद सेस ११.५० लाख असे एकूण १७.५० लाख वाटप असे वित्तप्रेषणामधून गट स्तरावर विहित अनुदान खर्चाबाबत मार्गदर्शक सूचना देऊन स्थानिक पातळीवर प्रभावी आहार खरेदीबाबत तांत्रिक मान्यतेच्या आदेशाचे अगदी विरुध्द नियमबाह्य कार्यवाही करणेत आली आहे. ह्या अनियमिततेबाबत आयुक्तांचे क्षमापन प्राप्त करावे.

२) मा आयुक्त महिला व बालकल्याण विकास विभाग, पुणे यांचे मार्गदर्शक सूचना आदेशात नमुद अटी व शर्तीनुसार सर्व अंगणवाडी केंद्रातील बालकाची बाब योग्य तज्ञामार्फत रोग निदान शिबिराचे माध्यमातून तपासणीबाबत कुपोषित ३ व ४ श्रेणीतील बालके निश्चित करुन त्यांना याजनेचा लाभ द्यावा असे नमुद केले आहे त्यानुसार महिला व बालकल्याण

विभागामार्फत योजनेचा दिनांक २८.३.२००८ चे आदेशानुसार कुपोषित बालकांच्या तपासणीसाठी आरोग्य शिबिरे आयोजित केलेबाबत व त्यांची श्रेणीवाढ झालेबाबत उद्दिष्टपूर्ती अहवाल दर्शवावा.

वरील आक्षेपांची पुर्तता करावी.

तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ६,००,०००/-
आक्षेपाधिन रक्कम रुपये ११.५० लाख
आदिवासी उपयोजना व जिल्हा परिषद सेस

(विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा अ. क्र. १ )
(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. १ )

---

**परिच्छेद क्रमांक २ :- गरीब महिलांना स्वयंरोजगारासाठी शेवया मशिन पुरवणे ९०%**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र. ४ / दि. २६.६.२००८ |
| तांत्रिक मान्यता | महिला व बालविकास अधिकारी यांचे आदेश क्र. विअ/तां.मा./का-६/नाशिक |
| एकूण तरतुद | १) जिल्हा परिषद सेस रु. ६,००,०००/-<br>आदिवासी उपयोजना रु. ३,७५,०००/-<br>असे एकूण रु.९,७५,०००/- |
| पुरवठा आदेश | ४३२/२००७ दिनांक २७.९.२००७ |
| पुरवठाधारकाचे नाव | रितेश ब्रॅण्ड मशिन |
| एकूण खर्च | ६५ नग X १४७४९ = ९,५८,६८५.०० |
| लेखाशिर्ष | १) जि.प.सेस ५,८९,९६०/-<br>२) आदिवासी उपयोजना ३,६८,७२४/-<br>एकूण = ६,५८,६८५/- |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) स्वयंरोजगारासाठी गरीब लाभार्थी शेवया मशिन ९०% अनुदानावर वाटप करावयाचे आहे. ह्या मशिनसाठी लाभार्थीकडून १०% हिस्सा प्राप्त करावयाचा आहे. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने ६५ मशिनसाठी प्रतिनग रुपये १४,७४९/- प्रमाणे खरेदी केलेली आहे व त्यानंतर लाभार्थीना वाटप करतांना १०% हिस्सा वसूल करुन त्या त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्याची कार्यवाही केली आहे.

वास्तविक लाभार्थी हिश्याची १०% रक्कम रुपये ९५,८६८/- (९,५८,६८५/- चे १०%) त्या त्या लेखशिर्षाखालील भरणा करणेपेक्षा, संबंधित मक्तेदारास अनुदानातून ९०% प्रदान करुन उर्वरित १०% रक्कम लाभार्थीकडून प्राप्त झालेनंतर त्याचे प्रदान केले गेले असते तर ही योजना राबवतांना ६५ लाभार्थी ऐवजी ७१ लाभार्थींचा समावेश झाला असता. तसेच शासन व जिल्हा परिषद सेस अनुदानांचा पुरेपुर वापर होऊन जास्तीच्या ६ लाभार्थींना फायदा

या योजनेतून झाला असता. मात्र, तृटीपूर्ण अंमलबजावणीमुळे शासन अनुदानाचा १००% वापर झाला नाही, हे स्पष्ट होते, ह्या अनियमिततेबाबत शासनाचे क्षमापन प्राप्त करावे.

२) काही लाभार्थ्यांच्या प्रस्तावांसोबत पुढीलप्रमाणे कागदपत्रांची अपूर्णता आहे.

| अ. क्र. | लाभार्थीचे नाव | तालुका | वस्तु मिळाल्याची स्वाक्षरी नाही | जातीचा दाखला | चलन रक्कम | रु. १०० /- चा स्टॅम्प |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शितल उत्तम शिंदे | निफाड | नाही | - | - | - |
| २ | लता बाळासाहेब आहेर | निफाड | नाही | - | - | - |
| ३ | शांताबाई सखराम दळवी | सुरगाणा | नाही | नाही | नाही | - |
| ४ | चंद्राबाई नारायण हिन्डे अर्जावर अंगठा बॉण्डवर इंग्लिश स्वाक्षरी | सुरगाणा | नाही | - | - | - |
| ५ | रत्नाबाई शं. जेजूरकर | येवला | - | - | - | नाही |

३) शेवया मशिन तपासणी कार्यान्वित केल्याचे अहवाल प्राप्त करणे क्रमप्राप्त होते परंतु त्यानुसार कार्यवाही नाही.

४) सदरचे मशिन खरेदीसाठी कृषि संचालक, पुणे यांनी कृषि अवजारासाठी सन २००६ - २००७ दर मंजूरीनुसार खरेदी केली आहे. परंतु त्यासोबत मशिनच्या स्पेसिफीकेशन चा उल्लेख नाही, मात्र चाचणी अहवालात आहे. याबाबत खरेदी केलेली मशिन योग्य स्पेसिफीकेशनची असल्याबाबत कृषि संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावे.

५) या मशिन्सचा स्वयंरोजगारासाठी फायदा होऊन लाभार्थ्यांच्या उत्पन्नामध्ये भर पडली काय? ही मशिन्स कार्यरत आहेत, त्यांची आवश्यक दुरुस्ती देखभाल होत आहे; या नियमित पडताळणीसाठी प्रशासनाने काय कार्यपध्दती अवलंबली आहे व त्याचे निष्कर्ष काय आहेत, याबाबत सविस्तर उद्दिष्टपूर्ती अहवाल सादर व्हावा.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता करुन अनुपालन दाखवावे.

आक्षेपाधिन रक्कम रुपये ९,५८,६८५/-
आदिवासी उपयोजना

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. २ पहा)

---

**परिच्छेद क्रमांक ३ :- मुलींना लेडीज सायकल पुरविणेबाबत.**

| प्रशासकीय मान्यता | महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.४ /दि. २६.६.२००७ |
|---|---|
| तांत्रिक मान्यता | महिला व बालविकास यांचे आदेश क्र. विअ/तां.मा./९९-२०००/का-६/१४२१ दिनांक १०.१.२००७ |
| एकूण तरतुद | १) जिल्हा परिषद सेस रु. १०,११,०००/-<br>आदिवासी उपयोजना रु. ३,७५,०००/-<br>असे एकूण रु. १३,८६,०००/- |

| | |
|---|---|
| पुरवठा आदेश | महिला बालविकास /अर्थ/८९/२००८ दिनांक १०.३.२००८ |
| पुरवठाधारकाचे नाव | मीना इंटरप्रायझेस पिंपळगाव बसवंत, पिंपळगाव |
| एकूण खर्च | जि.प.सेस ५२३ X १९३३ = १०,१०,९५९/-<br>१९४ X १९३३ = ३,७५,००२/-<br>१३,८५,९६१/- |
| लेखाशिर्ष | १) जि.प.सेस १०,११,०००/-<br>२) आदिवासी उपयोजना ३,७५,०००/- |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परिषद, नाशिक यांचे पत्र क्रमांक जिपना/मवबाक/अर्थ/१३ दिनांक २१.१.२००८ नुसार खालील तरतुदीचे पालन करण्यात आले नाही.

१) निफाड, नाशिक, सुरगाणा, दिंडोरी, सिन्नर, मालेगाव, चांदवड या तालुक्यांनी आगार प्रमुख दाखला एकूण लाभार्थीच्या प्रस्तावासोबत जोडला नाही.

२) मालेगाव तालुका यांनी एकूण लाभार्थीच्या प्रस्तावासाबत शौचालय व वस्तु मिळाल्याची नमुना नंबर ३३ स्वाक्षरी नाही.

३) चांदवड तालुका यांनी एकुण लाभार्थीच्या प्रस्तावासोबत रुपये २०/- चा स्टॅम्प जोडला नाही.

४) सुरगाणा तालुका येथील लाभार्थी कु रेखा चंद्रकांत देशमुख यांचा लाभार्थी प्रस्तावासोबत अर्जावर स्वाक्षरी नाही, स्टॅम्प नाही, विनियोग दाखल्यावर स्वाक्षरी नाही.

५) येवला तालुका येथील लाभार्थी मंजूर यादी क्रमांक २४ कु. जागृती नितीन अहिरे यांचा लाभार्थी प्रस्ताव असतांना कु. चैताली रघुनाथ कदम यांना लाभ दिला. सदरची नियमबाह्य लाभाची रक्कम रुपये १,९३३/- संबंधितांकडून वसूल करावी.

६) कु. छाया हिरामण खैरनार व कु. अर्चना हिरामण खैरनार या एकाच कुटूंबातील असूनही लाभ दिला आहे. उपरोक्त आदेशातील अटी व शर्तीनुसार रक्कम रुपये २१,०००/- च्या वरील उत्पन्न धारकास लाभ देय नाही. सदर कुटूंबाचे उत्पन्न हे रुपये २९,५००/- असून दोन्ही लाभार्थीकडून एकूण रक्कम रुपये ३,८६६/- वसूल करुन भरणा करावी.

७) विवरण पत्र क्रमांक १ अन्वये १ ते ३२ अनियमिततेविषयी पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

वसूलपात्र रक्कम रुपये ५,७९९/-
आक्षेपाधिन रक्कम रुपये १३,८०,१६२/-

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ३ पहा)

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणेबाबत.**

महिला व बालविकास योजना, जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविण्याकरीता खालील संस्थांना मजूरी दिली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव |
|---|---|
| १ | यशोदा सामाजिक विकास संस्था, नाशिक |
| २ | भारतीय स्त्री शक्ती नाशिक शाखा (नाशिक, दिंडोरी) |
| ३ | प्रेमांकुर सामाजिक संस्था (नाशिक, सुरगाणा) |

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक यांचे पत्र क्र. ४१८/०७ दिनांक २५.९.२००७ अन्वये योजनेच्या प्रशासकीय मंजूरीच्या अटी व शर्ती अन्वये पुर्तता करण्यात आली नाही.

१) उपरोक्त संस्थांचे तीन वर्षाचे कार्य अहवाल नाहीत.

२) संस्थेकडे महिलांच्या हुडांबळी, विभक्त कुटूंबाच्या समस्या, घरगुती अत्याचार ह्या समस्या सोडविण्याचा अनुभव असल्याबाबत कार्य अहवालांअभावी खात्री होऊ शकत नाही.

३) संस्थेकडे समुपदेशक व विधी सल्लागार उपलब्ध आहेत, याबाबत सविस्तर तपशील संस्थेच्या प्रस्तावात नमुद नाही.

४) सदर संस्थेत महिलाच्या सामाजिक आर्थिक व विधी साक्षरता विषयक उपक्रमाचा अनुभवाचा तपशील नमुद नाही.

उपरोक्त अटी व शर्तीची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक ५ :- संगणक प्रशिक्षण / तांत्रिक प्रशिक्षण खर्चाबाबत.**

पंचायत समिती कळवणने सन २००७ – २००८ मध्ये महिला व बालविकासावर खालीलप्रमाणे खर्च नोंदविण्यात आलेला आहे.

| प्र.क्र | दिनांक | रक्कम रुपये | लेखाशिर्ष | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १०२ | ३१.३.२००८ | १०,००० | जि.प.सेस | संगणक प्रशिक्षण प्रति लाभार्थी रु. २०००/- |
| ११५ | ३१.३.२००८ | ७५,००० | जि.प.सेस | तांत्रिक प्रशिक्षण प्रति लाभार्थी रु. ५०००/- |
| | **एकूण** | ८५,००० | | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१) संगणक प्रशिक्षण व तांत्रिक प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबत उत्तीर्ण प्रमाणपत्र लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाहीत.

२) यापूर्वी या योजनेचा लाभ दिला किंवा कसे याबाबतची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

३) संगणक प्रशिक्षण / तांत्रिक प्रशिक्षण देणा-या संस्थेस आलेल्या प्रदानांच्या पोचपावत्या उपलब्ध झाल्या नाहीत.

वरील प्रमाणे आक्षेपाची पुर्तता होईपोवतो रक्कम रुपये ८५,०००/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष<br>
जि.प. सेस<br>
आक्षेपाधिन रक्कम रु. ८५,०००/-<br>
पं. स. कळवण

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ५ पहा)

---

**परिच्छेद क्रमांक ६ :- मुलींना ज्युडो कराटे प्रशिक्षण खर्च करणेतील अनियमितता.**

पंचायत समिती सुरगाणा यांचेकडील प्रमाणक क्रमांक ४९४ दिनांक ३१.३.२००८ रक्कम रु. १३,५००/- व प्रमाणक क्रमांक ४९५ दिनांक ३१.३.२००८ रक्कम रु. १३,५००/- असे एकूण २७,०००/- इतका खर्च मुलींना ज्युडा कराटे प्रशिक्षण देणे कामी २ प्रशिक्षण वर्षासाठी करण्यात आलेला आहे. सदर योजनेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे कडील आदेश क्रमांक मबाक/अर्थ/ ४३२ दि. २९.१०.२००७ अन्वये तांत्रिक मंजुरी देण्यात आली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) एकूण २ प्रशिक्षणासाठी श्री. नितिन निवृत्ती पवार व श्री. सचीन निवृत्ती पवार यांची प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली. तथापी योजनेच्या अटी व शर्ती नुसार श्री. सचीन निवृत्ती पवार हे ब्लॅक बेल्ट प्रमाणपत्र धारक असल्याबाबत प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध झाली नाही.

२) प्रशिक्षण नेमके कोणत्या शाळा, आश्रमशाळा, व महाविद्यालयाच्या समन्वयाने घेण्यात येत आले याबाबत संबंधीत मुख्याध्यापकांचा अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झालेला नाही.

३) लाभार्थी मुली प्रशिक्षणास उपस्थित राहिल्याबाबत हजेरी पट ठेवण्यात आलेला नाही.

उपरोक्त बाबींची पूर्तता करुन अनुपालन लेखापरिक्षणास दर्शवावे. तो पावेतो सदर योजनेवर झालेला खर्च रु. २७,०००/- शासकीय अनुदानासाठी तात्पुरता अमान्य करण्यात येत आहे.

२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण<br>
आदिवासी उपयोजना<br>
२० संकीर्ण (२२३५२२९७)<br>
तात्पुरती अमान्य रक्कम रु. २७,०००/-<br>
(पं. स. सुरगाणा)

(विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा अ.क्र. २ पहा)

---

**परिच्छेद क्रमांक ७:- मुलींना संगणक प्रशिक्षण ( एमएससीआयटी) देणेबाबत.**

प्रमाणक क्रमांक ४९३ दिनांक ३१.३.२००८ अन्वये रक्कम रु. १०,०००/- प्रमाणे १२ वी पास मुलींना २,००० रुपये प्रमाणे ५ मुलींना एमएससीआयटी प्रशिक्षणासाठी अदा करण्यात आलेले आहेत.

सदरच्या योजनेस मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक मबाक/अर्थ/४१९ दिनांक २५.९.२००७ नुसार प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली असून त्यात नमुद खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात आलेले नाही.

अ) खालील विद्यार्थिनींचे एमएससीआयटी परिक्षेस बसल्याचे प्रमाणपत्र अथवा उत्तीर्ण प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाहीत.

१) सुनिता सादुराम बागुल
२) मिनाक्षी देवराम भोये
३) संगिता अंबादास गावित
४) मनिषा पोपट पवार
५) वैशाली तुळशीराम चव्हाण

प्रशासकीय मंजुरी मधील अट क्रमांक ११ नुसार लाभार्थी परिक्षेस बसला नाही तर लाभाची संपुर्ण रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

वरील विद्यार्थिनी परिक्षेस बसल्याचे प्रमाणपत्र/उत्तीर्ण प्रमाणपत्र घेण्यात आलेले नसल्याने प्रशिक्षणाचा उद्येश सफल झाला याची पडताळणी करता आली नाही. तरी सदरचे प्रमाणपत्रे तपासणीस उपलब्ध करण्यात यावी

ब) कु. मनिषा पोपट पवार यांचेकडून रुपये २०/- चे मुद्रांकावर करारनामा करण्यात आलेला नाही

क) अट क्रमांक ४ नुसार लाभार्थी मुलींच्या कुटूंबाकडे वैयक्तिक शौचालय असल्याबाबत दाखला घेणे आवश्यक असतांना दाखला घेण्यात आलेला नाही.

ड) अ.क्र.६ नुसार लाभार्थी मुलगी ही अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे कुटूंबापैकी तसेच शासकीय सेवेत कार्यरत कर्मचारी / अधिकारी यांचे कुटूंबातील नसावी. तसा सरपंच / ग्रामसेवक यांचा दाखला आवश्यक असतांना घेण्यात आलेला नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखविण्यात यावे.

लेखाशिर्ष
महिला व बालकल्याण विभाग, जिल्हानिधी,
आक्षेपाधिन रक्कम रुपये १०,०००/-
पंचायत समिती सुरगाणा

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ७ पहा)

---

## परिच्छेद क्रमांक ८ :- शासकीय योजनेची १० टक्के लाभार्थी हिश्याची रक्कम जि.प. लेखाशिर्षासाठी भरणा केलेबाबत.

पंचायत समिती, पेठ, सन २००७-०८ मधील एकात्मिक बालविकास विभागाकडील किरकोळ रोकडवहीची पडताळणी केली असता, शासन अनुदानीत योजना १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण व महिलांना स्वयंरोजगारासाठी शेवया मशिन पुरविणे या योजनांमधील १० टक्के लाभार्थी हिस्सा अनुक्रमे रक्कम रुपये १,००० व ९,००० अशी एकूण रुपये १०,००० शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा न करता जिल्हापरिषद सेस खाती भरणा करुन अनियमितता केलेली आहे. तरी सदरची रक्कम शासकीय लेखशिर्षाखाली भरणा करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

तसेच उपरोक्त नमुद कार्यवाहीप्रमाणे शासकीय योजनेतील लाभार्थी हिश्यांच्या रक्कम यापूर्वीही जिल्हापरिषद सेस खाती भरणा केलेल्या असल्याचे आढळून आले. त्या सर्व रक्कम जिल्हापरिषद सेस खात्यामधून शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात याव्यात. यावरुन जमा बाबींबाबत लेखविभाग, पेठ यांचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसून येते. यापुढे याबाबत दक्षता घेण्यात यावी.

लेखाशिर्ष
आदिवासी उपयोजना
महिला बालकल्याण कार्यक्रम
पंचायत समिती, पेठ

---

## परिच्छेद क्रमांक ९ :- मुलींना संगणक प्रशिक्षण (एम.एस.सी.आय.टी.) देणेबाबत.

प्रमाणक क्रमांक ६९ दिनांक ३१.३.२००८ अन्वये रक्कम रु. २०,०००/- प्रमाणे १२ वी पास मुलींना २,०००/- रुपये प्रमाणे १० मुलींना एमएससीआयटी प्रशिक्षणासाठी अदा करण्यात आलेले आहेत.

सदरच्या योजनेस मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक मबाक/अर्थ/४१९ दिनांक २५.९.२००७ नुसार प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली असून त्यात नमुद खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात आलेले नाही.

अ) सदरचे संगणक प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशनची मान्यता प्राप्त नाशिक जिल्हयातील प्रमाणित संस्थेमधुन उमेदवारांनी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे नोंदणीकृत संस्थेत नाव नोंदणी केल्याबाबत नोंदी नाहीत.

ब) नोंदणीकृत संस्थेस धनादेशान्वये रक्कमा अदा करणे आवश्यक असतांना त्या रोखीने अदा करण्यात आलेल्या आहेत. सदरची बाब ही अनियमित असून याबाबत संबंधीतांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

क) खालील विद्यार्थिनींचे एमएससीआयटी परिक्षेस बसल्याचे प्रमाणपत्र अथवा उत्तीर्ण प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाहीत.

१) मोनाली प्रकाशराव हरबोले, बोलठाण
२) तृप्ती रविंद्र आहेर, मांडवड
३) पल्लवी प्रदिप लोटाडे, मांडवड
४) माधुरी गोपाल पारी, मांडवड
५) सोनाली वाल्मीक बारवरकर, बोलठाण
६) रुकसाना इसाक सैय्यद, बोलठाण

वरील विद्यार्थिनी परिक्षेस बसल्याचे प्रमाणपत्र/ उत्तीर्ण प्रमाणपत्र घेण्यात आलेले नसल्याने प्रशिक्षणाचा उद्देश कितपत सफल झाला याची पडताळणी करता आली नाही. तरी सदरचे प्रमाणपत्रे उपलब्ध करण्यात यावी किंवा अदा रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात यावी.

ड) उपरोक्त नमुद अटी व शर्तीनुसार विद्यार्थीनीचे कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये २१,०००/- च्या आत असणे आवश्यक आहे. तथापि खालील विद्यार्थीनींचे तहसिलदार यांचे जोडलेल्या उत्पन्नाच्या दाखल्यनुसार ते रुपये २१,०००/- पेक्षा जास्त असल्याचे आढळून आले.

| | |
|---|---|
| १. कु. मोनाली प्रकाशराव हरबोले, बोलठाण | उत्पन्न रुपये ३०,०००/- |
| २. कु. शितल दशरथ अहिरे, नवसारी | उत्पन्न रुपये २२,०००/- |
| ३. कु. रोहिणी विनय नरोटे, क्रांतीनगर | उत्पन्न रुपये २५,०००/- |

योजनेचे अटी व शर्तीनुसार उपरोक्त नमुद विद्यार्थीनींचे उत्पन्न हे रुपये २१,०००/- पेक्षा जास्त असल्याने सदर लाभ देय होत नाही. सबब संबंधितांना अदा रक्कम रुपये ६,०००/- (प्रत्येकी रुपये २,०००/- प्रमाणे) संबंधितांकडून वसूल करण्यात यावी.

वरील आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखविण्यात यावे.

लेखाशिर्ष
महिला व बालकल्याण विभाग,
जिल्हानिधी,
आक्षेपाधिन रक्कम रुपये १४,०००/-
वसूलपात्र रक्कम रुपये ६,०००/-
पंचायत समिती नांदगाव

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ६ पहा)

---

**<u>परिच्छेद क्रमांक १० :- महिला व मुलींना तांत्रिक प्रशिक्षण देणेबाबत.</u>**

प्रमाणक क्रमांक ७३ दिनांक ३१.३.२००८ अन्वये रक्कम रु. १,००,०००/- विनकॉम कॉम्प्युटर ॲकेडमी, चांदवड यांना २० लाभार्थ्यांचे १ वर्षाचे प्रशिक्षणासाठीचे प्रती लाभार्थी रुपये ५,०००/- प्रमाणे अदा केलेले आहेत.

सदरचे लाभार्थी परीक्षेस बसल्याबाबतचे प्रमाणपत्र घेण्यात आलेली नाहीत. त्यामुळे योजनेचे उद्देश कितपत सफल झाला याची पडताळणी करता आली नाही. सबब खर्च रक्कम रुपये १,००,०००/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
महिला व बालकल्याण विभाग,
जिल्हा परिषद सेस,
आक्षेपाधिन रक्कम रुपये १,००,०००/-
पंचायत समिती चांदवड

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ७ पहा)

---

**<u>परिच्छेद क्रमांक ११ :- संगणक प्रशिक्षण (एम.एस.सी.आय.टी.) बाबत.</u>**

प्रमाणक क्रमांक २३ दिनांक ३१.३.२००८ अन्वये १५ लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी रुपये २,०००/- एकूण रुपये ३०,०००/- अदा करण्यात आलेले आहेत.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सदरच्या योजनेस मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक मबाक/अर्थ/४१९ दिनांक २५.९.२००७ नुसार प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली असून त्यात नमुद खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात आलेले नाही.

१) सदरचे संगणक प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशनची मान्यता प्राप्त नाशिक जिल्हयातील प्रमाणित संस्थेमधुन उमेदवारांनी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे नोंदणीकृत संस्थेत नाव नोंदणी केल्याबाबत नोंदी नाहीत.

२) प्रती लाभार्थी १०% हिस्स्याप्रमाणे एकूण रक्कम रुपये ३,०००/- भरणा करण्यात आलेला आहे. परंतु लाभार्थ्यांना नमुना नंबर १० मध्ये (सामान्य पावती) पावती देण्यात आलेली नाही. त्यामुळे रक्कमा कधी वसूल केल्या याचे साधार स्पष्टीकरण व्हावे.

३) नोंदणीकृत संस्थेस धनादेशान्वये रक्कमा अदा करणे आवश्यक असतांना त्या रोखीने अदा करण्यात आलेल्या आहेत. सदरची बाब ही अनियमित असून याबाबत संबंधीतांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

४) खालील लाभार्थ्यांचे १२ वी पास असल्याचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. त्यामुळे लाभार्थी योजनेच्या अटी व शर्तीनुसार १२ वी पास असल्याची पडताळणी करता आली नाही. (सायमा अब्दुल हफिज शेख, चांदवड)

५) खालील १५ लाभार्थ्यंचे खालीलप्रमाणे अटी व शर्तीनुसार कागदपत्रे घेण्यात नाहीत.

| अ.क्र | लाभार्थ्यांचे नाव | गाव | अपूर्णता |
|---|---|---|---|
| १ | वैशाली कचरु वाघमोडे | चांदवड | १. एम.एस.सी.आय.टी. साठी कुठल्या संस्थेत प्रवेश घेतल्याची प्रवेश फी पावती घेण्यात आलेली नाही.<br>२. एम.एस.सी.आय.टी. परीक्षा दिल्याची कागदपत्रे नाहीत.<br>३. परीक्षेच्या निकालाचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. |
| २ | अंजली केदु बनकर | चांदवड | |
| ३ | निलम अरुण यशवंते | आसरखेडे | |
| ४ | पुनम भगवान जाधव | चांदवड | |
| ५ | आश्विनी जयवंत केदारे | चांदवड | |
| ६ | प्रमिला चंद्रकांत गांगुर्डे | चांदवड | |
| ७ | सोनाली अशोक जाधव | चांदवड | |
| ८ | अनिता ठाकुरनाना कोतवाल | चांदवड | |
| ९ | विद्या राजेंद्र बनकर | चांदवड | |
| १० | जया रतन सवंदे | गणूर | |
| ११ | सायमा अब्दुल गनिम शेख | चांदवड | |
| १२ | कल्पना केदु कांदळकर | मनवेली | |
| १३ | भाग्यश्री सोपान पाटील | वावी बु।। | |

योजनेच्या अटी व शर्तीनुर लाभार्थी परीक्षेस बसला नाही तर त्यांचेकडून संपूर्ण रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. तथापि परीक्षा दिल्याची कागदपत्रे सोबत जोडलेली नसल्याने योजनेचा उद्देश कितपत सफल झाला याची पडताळणी करता आली नाही.

वरील आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे. तोपावेतो खर्च रक्कम रुपये २८,०००/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
महिला व बालकल्याण विभाग,
जिल्हा परिषद सेस,
आक्षेपाधिन रक्कम रुपये २८,०००/-
पंचायत समिती चांदवड

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ८ पहा)

---

## परिच्छेद क्रमांक १२ :- कुपोषित बालके यांना अतिरिक्त आहार देणेबाबत.

प्रमाणक क्रमांक ९३ दिनांक ३१.३.२००८ अन्वये एकूण २४ अंगणवाडींना रुपये १,७१९/- प्रमाणे रक्कम रुपये ४१,२५६/- कुपोषित बालके यांना अतिरिक्त आहार देणेसाठी अदा करणेत आलेले आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), जिल्हापरिषद, नाशिक यांचे पत्र क्रमांक जिपना/मबाक/अर्थ ९२/०८ चे मार्गदर्शक तत्वानुसार खालीलप्रमाणे पुर्तता करण्यात आलेले नाही.

१. सदरची रक्कम ही अंगणवाडी सेविका यांना अदा करण्यात आली असून त्यातून त्यांनी बालरोग तज्ञ यांनी ठरवून दिलेला आहार खरेदी करुन कुपोषित बालकांना द्यावयाचा आहे. तथापि त्यांनी कोणता आहार खरेदी करुन वाटप केला त्याचा अहवाल / उपयोगिता प्रमाणपत्रे घेण्यात आलेली नाहीत.

२. योजनेचा खर्च व होणा-या फलनिष्पत्तीचा अहवाल दरमहा जिल्हापरिषदेकडे सादर करणे आवश्यक असतांना याप्रमाणे अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे योजनेचा उद्देश कितपत सफल झाला याची खात्री करता आली नाही.

उपरोक्त नमुद आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे. तोपावेतो खर्च रक्कम रुपये ४१,२५६/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
महिला व बालकल्याण विभाग,
जिल्हा परिषद सेस अनुदान,
आक्षेपाधिन रक्कम रुपये ४१,२५६/-
पंचायत समिती देवळा

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ९ पहा)

---

**<u>परिच्छेद क्रमांक १३ :- गरीब महिलांना स्वयंरोजगारासाठी अनुदान पुरविणेबाबत.</u>**

